**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे ६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.</u>**

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 2283 /पीएस/२०

गुन्हा क्रमांक –

नि.क्र. 76/2026

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | :- | 29:03:2026 |
| २. | अपराध नोंदविण्याचा दिनांक | :- | 29:03:2026 |
| ३. | फिर्यादीचे नांव व पत्ता | :- | सरकार तर्फे सहा. पोलीस निरीक्षक,<br>**पोलीस ठाणे :** आरे |
| ४. | **<u>आरोपीचे नांव, वय व पत्ता</u>** | :- | श्री. अंकित बिंदप्रकाश गुप्ता<br>वय – 28 वर्षे,<br>रा. रूम नं 10, आरे, मुंबई. |
| ५. | **<u>आरोपाचा आशय</u>** | :- | |

दिनांक 29/03/2026 रोजी, रात्री 02:19 वाजताचे सुमारास आरे पिकनिक जंक्शन, पश्चिम द्रुतगती मार्ग मुंबई येथे आपण आपल्या ताब्यातील मोटरसायकल/वाहन हे हयगयीने व निष्काळजीपणे चालवली आणि याद्वारे आपण भारतीय न्याय संहितेचे कलम २८१ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपल्या ताब्यातील वाहन इतरांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे चालवले आणि याद्वारे आपण भारतीय न्याय संहितेचे कलम १२५ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

तसेच आपण उक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आपल्या ताब्यातील वाहन दारुच्या नशेत चालवून मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे निष्काळजीपणे चालवले आणि याद्वारे आपण मोटर वाहन कायदा अधिनियमचे कलम १८५ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाचे दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

27-04-26

**( व्ही. एफ. चौगुले )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

दिनांक : 27-04-2026

**आरोपीचे निवेदन :-**

प्र. १ : तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्र. २ : तुम्ही वकील नियुक्त केले आहे काय ?

उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला विधी सहाय्यता पाहिजे काय?

उत्तर : नाही.

प्र. ४ : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला आरोपाचा आशय समजला काय?

उत्तर : होय.

प्र. ५ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय, मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

Ankit ---------------

समक्ष

27.4.26

**( व्ही. एफ. चौगुले )**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

दिनांक : 27-04-2026

६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

**नि. १ वर आदेश.**

आरोपीने स्वतःहुन त्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्याने त्याची कमीत कमी दंडावर मुक्तता करण्यात यावी अशी या न्यायालयास विनंती केली आहे. मी आरोपीला त्याचेवर कोणाचा दबाव आहे काय? व तो स्वतःहुन गुन्हा कबूल करतो आहे काय? अशी विचारणा केली व गुन्हा कबूल केल्यास त्यास शिक्षा होऊ शकते याची कल्पना दिली व त्यास पुर्नविचार करण्याची संधी दिली, परंतू, तो त्याचेवर कोणचाही दबाव नाही व त्याला स्वतःहुन गुन्हा कबूल करावयाचा आहे असे कथन करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी स्वतःहुन गुन्हा कबूल करीत आहे व त्याचेवर कोणाचाही दबाव नाही. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आ दे श :**

१. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अंतर्गत आरोपींना भारतीय न्याय संहितेचे कलम २८१ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्यांना प्रत्येकी ५००/- रूपये (पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपींनी द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्यांना प्रत्येकी १५ (पंधरा) दिवसांचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

२. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अंतर्गत आरोपीला भारतीय न्याय संहितेचे कलम १२५ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्यांना प्रत्येकी २,५००/- रूपये (दोन हजार पाचशे रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपींनी द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्यांना प्रत्येकी १ (एक) महिन्यांची साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

३. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अंतर्गत आरोपीला मोटर वाहन कायदा अधिनयमचे कलम १८५ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला १०,०००/- रूपये (दहा हजार रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १ (एक) महिन्याचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

४. आरोपीला आदेशाची प्रमाणित प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)

27.4.26

**( व्ही. एफ. चौगुले )**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

दिनांक : 27-04-2026

६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई.

Paid Rs. 13000/-

Recpt. No. 0056625

27/4/26

Head Cashier

Borivali Centre of Courts, Mumbai